CNR MHAH190003832025

**आर.सी.सी.क्र.७१/२०२५**

**निशाणी क्र.११**

सरकार वि. अशोक बबन वाखरे व इतर.

# दोषारोप

मी – वैशाली सं. मोरे, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र.०२), शेवगाव याव्दारे दोषारोप ठेवते की,

आरोपी –

१. **अशोक बबन वखारे** , वयः४६ वर्षे, कामधंदा – मजुरी,

२. **सोपान अशोक वखारे,** वयः ३३ वर्षे, कामधंदा – मजुरी,

३. **दिपक अशोक वखारे,** वयः २२ वर्षे, कामधंदा – मजुरी ,

सर्व रा. जुने दहिफळ, ता. शेवगाव, जि. अहमदनगर.

१. दिनांक १६/०५/२०२४ रोजी, सकाळी ११.३० वा. चे सुमारास, मौजे जुने दहिफळ गावचे चौफुलीवर, ता. शेवगांव येथे आरोपी क्र.०३ ने आरोपी क्र.०१ व ०२ सह संगनमत करुन फायटरने फिर्यादीच्या तोंडावर, डोक्यावर, नाकावर, मारहाण करुन ईच्छापूर्वक दुखापत दुखापत केली व त्याव्दारे भारतीय दंड संहिता कलम **३२४ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला.

३. वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्याव्दारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम **३२३ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला.

४. वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी आपसात संगनमत करुन उद्देशपूर्वक शांतताभंग घडवून आणण्याच्या उद्देशाने शिवीगाळ करून फिर्यादीचा अपमान केला आणि त्यायोगे त्यास प्रक्षोभीत केले व त्यामागे फिर्यादीचे हातून अपराध घडावा असा तुमचा उद्देश होता, आणि त्याव्दारे तुम्ही भारतीय दंड विधान कलम **५०४ सह कलम ३४** अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला.

५. वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी आपसात संगनमत करुन उद्देशपूर्वक फिर्यादीचे मनात भय उत्पन्न करण्यासाठी फिर्यादीस जिवे ठार मारण्याची धमकी

दिली आणि त्याव्दारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम **५०६ सह कलम ३४** अन्वये शिक्षापात्र असलेला गुन्हा केला.

त्या अन्वये या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा गुन्हा केला.

दिनांकः—०७/०८/२०२५.

(वैशाली सं. मोरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.०२), शेवगाव.

**दाखला**

वरील दोषारोपातील सर्व आरोप आरोपींना मराठी भाषेत वाचुन दाखविले व समजावुन सांगीतले.

दिनांकः—०७/०८/२०२५.

(वैशाली सं. मोरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.०२), शेवगाव.